लोकमत

# कौटुंबिक हिंसा प्रतिबंधासाठी आता आशा वर्करही सज्ज

## जि.प. प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** आरोग्य जनजागृतीसोबतच आता जि. प. आरोग्य विभागाने महिलांवर होणारा कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी 'आशा' कर्मचाऱ्यांमार्फत काम केले जाणार आहे. यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्याचे अभियान हाती घेण्यात आले आहे. महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम), सेहत आणि 'व्हॉट वर्क्स टू' या संस्थांच्या सहकार्याने 'उडान प्रकल्प' अंतर्गत गंगापूर व पैठण तालुक्यांत सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेने महिलांविरुद्ध हिंसाचार प्रतिबंधासाठी 'आशा' कर्मचाऱ्यांना सक्षम करण्याचा उपक्रम सुरू आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये हिंसाग्रस्त महिलांसाठी समुपदेशन सेवा उपलब्ध करण्यात आली आहे.

**६५०**

**आशा कर्मचाऱ्यांना नोव्हेंबरात प्रशिक्षण देणार**

पैठण व गंगापूर तालुक्यातील सुमारे ६५० आशा कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर महिन्यात प्रशिक्षण देणार आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, जिल्हा आशा समन्वयक संपदा चव्हाण, जिल्हा मूल्यमापक- सनियंत्रण सचिन काशिद यांनी मार्गदर्शन केले.

जागतिक आरोग्य संघटनेने विकसित केलेल्या 'लाइव्ज' कौशल्य मॉड्यूलचा या प्रशिक्षणात समावेश होता. संवेदनशील संवाद, निरीक्षण, आणि साहाय्य देण्याच्या कौशल्यावर भर देण्यात आला. भरोसा कक्षाच्या पोलिस निरीक्षक सरला गाडेकर, संरक्षण अधिकारी पुनमसिंग बमनाथ, सखी वन स्टॉप सेंटरच्या पल्लवी बिदरकर, अश्विनी ताठे आणि 'टिस' सेलच्या संध्या बिडला यांनी हिंसाग्रस्त महिलांसाठी शासकीय सेवांची माहिती दिली व सहकार्याचे आश्वासन दिले.


Powered by: erelego.com